आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ जून २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याच्या मुद्द्यावरुन विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ / पुढच्या वर्षीपासून TET ऑनलाइन घेण्याचा सरकारचा विचार

- नसरापूर बालिका अत्याचार आणि हत्या प्रकरणातल्या आरोपीला फाशीची शिक्षा/ ५८ दिवसात निकाल देणारा राज्यातला सर्वात वेगवान खटला

- अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यास निधी अपहार प्रकरणी जनहित याचिकेची तातडीनं सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाचा पुन्हा नकार

**आणि**

- २०२८ च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघ पात्र

**<><><><><>**

टीईटी, अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याप्रकरणी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज गदारोळ झाला. पेपरफुटी प्रकरणी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडू देण्याचा विरोधकांचा प्रस्ताव विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावला. पेपरफुटीशी सरकारचा थेट संबंध आहे अशी चर्चा असल्याचं सांगत याप्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला हवी अशी मागणी भास्कर जाधव यांनी केली. तर  या पेपरची छपाई परराज्यात का केली असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. स्थगन प्रस्ताव मांडू न दिल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. नंतर याबाबत सरकारतर्फे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी निवेदन दिलं.

राज्यात पुढच्या वर्षीपासून शिक्षक पात्रता परीक्षेसह इतर परीक्षा ऑनलाइन पद्धतीनं घेण्याकरता आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाईल, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. या प्रकरणातल्या सर्व आरोपींवर मकोका लावण्यासाठी कायद्यात कायद्यात आवश्यक बदल करण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे, असंही भुसे म्हणाले.

**बाईट- भुसे**

**<><><><><>**

कर्जमुक्ती योजनेची रक्कम ५ जुलैनंतर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, असं आश्वासन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत दिलं. पुरवणी मागण्यांवरच्या चर्चांना उत्तर देताना ते बोलत होते. शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी फसवी असून सरकार केवळ आकड्यांचा खेळ करत असल्याची टीका काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. ५६ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ होणार असल्याचं सरकार सांगत आहे, मात्र केवळ १२ लाख शेतकरीच यासाठी पात्र ठरणार असल्याचं वडेट्टीवार म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करताना ३७ हजार ५५ कोटी रुपयांची महसुली तूट होती. १ लाख ५३ हजार ६२६ कोटी रुपये प्रत्यक्षात खर्च केले नाहीत. मग पुरवणी मागण्या सादर का केल्या जातात, असा सवाल त्यांनी केला. राजकोषीय तुटीनं मर्यादा ओलांडली आहे याकडे त्यांनी लक्ष वेधलं. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक १ जुलै रोजी घेण्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली. इच्छुक सदस्यांनी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करावेत. त्यांची छाननी उद्या १ वाजता होईल, असं त्यांनी जाहीर केलं.

**<><><><>**

आपला सेशेल्स दौरा यशस्वी झाला असून यामुळे भारत आणि सेशेल्स  यांच्यातले संबंध अधिक दृढ होतील असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हा दौरा आटोपल्यानंतर समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

गेली पन्नास वर्षं दोन्ही देशामधले संबंध परस्पर विश्वासावर आधारित होते, पुढच्या पन्नास वर्षातले संबंध हे नवोन्मेष, शाश्वतता आणि सामायिक समृद्धीवर आधारलेले असतील असं प्रधानमंत्री म्हणाले. सेशेल्सच्या ५० व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याला उपस्थित राहता आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. तसंच सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर पॅट्रिक हर्मिनी यांचे आभार मानले.

**<><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या भोर तालुक्यातल्या नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्या प्रकरणातला आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली आहे. पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आज हा निर्णय दिला. आरोपीने केलेला गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि 'दुर्मीळातील दुर्मिळ' स्वरूपाचा असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. आरोपीविरोधात सादर करण्यात आलेले परिस्थितीजन्य आणि वैज्ञानिक पुरावे भक्कम असल्याचं निरीक्षण नोंदवत, केवळ वय हा शिक्षेत सवलत देण्याचा आधार ठरू शकत नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून ५८ दिवसांत निर्णय देण्यात आल्यामुळे हा राज्यातला सर्वात वेगवान खटला ठरला आहे. १ मे रोजी नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून आरोपीने तिची हत्या केली होती. त्यानंतर राज्यभरात जनक्षोभ उसळला होता. या प्रकरणाचा जलद तपास आणि निकाल लावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी न्यायालय, पोलीस, वकीलांचे आभार मानले आहेत. विधानसभेत त्यांनी यासंदर्भात निवेदन केलं. सुट्या रद्द करुन काम केल्याबद्दल न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांचे त्यांनी आभार मानले. वेगात काम करायचं ठरवलं तर २ महिन्याच्या आत शिक्षा सुनावता येते हे यामधून दिसून आलं. यापुढेही अशाच पद्धतीनं वेगवान काम करण्याचा प्रयत्न असेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

या निकालामुळे सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ झाल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या निकालावर समाधान व्यक्त केलं तसंच न्यायालयाचे आभार मानले.

- **- होल्ड बाईट शिंदे** - -

- **<><><><><>**

अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यासाच्या निधीचा अपहार झाल्याप्रकरणी दाद मागणाऱ्या जनहितयाचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. न्यासाच्या कारभारात गैरप्रकार झाले असल्याचा आरोप करुन न्यायालयाच्या देखरेखीखाली या व्यवहाराचं फोरेन्सिक लेखा परीक्षण करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी याचिकेत केली होती. मात्र या प्रकरणाची सुनावणी तातडीनं करण्याची आवश्यकता नमूद

करणारं पत्र सादर करायला न्यायालयानेसांगितलं. न्यायालयाच्या उन्हाळी सुट्टीनंतर याचिका पुन्हा सुनावणीला ठेवण्याचे आदेश न्यायमूर्ती एम एम सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांनी दिले.

दरम्यान, या प्रकरणातल्या आरोपींचं वकीलपत्र न घेण्याचा ठराव फैजाबाद वकील संघटनेनं केला आहे. याचं उल्लंघन करणाऱ्या वकीलाला ५ लाख रुपये दंड करण्याचा निर्णय वकील संघटनेच्या सर्वसाधारण सभेत आज घेण्यात आला.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते लष्कर, नौदल, वायुदल आणि तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी देण्यात येणाऱ्या सैन्यदल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात करण्यात आलं. यात ७ सर्वोत्तम युद्ध सेवा पदके, ३० परम विशिष्ट सेवा पदके, १२ उत्तम युद्ध सेवा पदके, आणि ५६ अतिविशिष्ट सेवा पदकांचा समावेश होता. पदकं प्राप्त करणाऱ्या अधिकऱ्यांमध्ये  दोन महिला अधिकाऱ्यांचाही समावेश होता.

उपराष्ट्रपति सी.पी राधाकृष्णन, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अन्य केंद्रीय मंत्री आणि सुरक्षा दलांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

२०२८ च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघ पहिल्यांदाच पात्र ठरला आहे. या संघानं ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन आणि दक्षिण आफ्रिकेसोबत महिला टी ट्वेंटी स्पर्धेत  प्रवेश मिळवला आहे.

पुरुष क्रिकेट स्पर्धेचे पात्रता निकष वेगळे असल्यानं या वर्षाच्या अखेरीला त्याबाबतचा निर्णय होईल.

<><><><><>

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. फुलर्टन इथं पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात काल चिनी तैपेईच्या सू ली यांगकडून त्याला १५-२१, २१-१६,९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

//<><><><><>//